आय.एन.आर फॉर नवी दिल्ली
र.नं. MAHMAR-35829-2010
UGC Approved and peer
Reviewed Journal

ISSN - 2229-4929

# अक्षर वाङ्मय

वर्ष – दहावे

## (विशेषांक)

रयत शिक्षण संस्थेचे

**दहिवडी कॉलेज दहिवडी, ता. माण, जि. सातारा.**

दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद

आंतरराष्ट्रीय परिषद – दि. १९ व २० डिसेंबर २०१९

# मराठी साहित्यातील लिंग, जात व धर्म विषयक समता - विषमता

**प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव**
दहिवडी कॉलेज दहिवडी

**प्रा. ए. एन. दडस**
समन्वयक

**प्रा. डॉ. बी. एस. बळवंत**
संयोजक

**प्रा. मीरा देठे**
प्रमुख मराठी विभाग

**प्रा. डॉ. बी. एस. वाघमोडे**
मराठी विभाग

आर.एन्.आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र.नं. - MAHMAR-36829-2010

ISSN - 2229-4929
UGC Approved and Peer Reviewed Journal

# अक्षर वाङ्मय

वर्ष : दहावे अंक : दुसरा

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१९

**✲ संपादक ✲**

डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

**✲ कार्यकारी संपादक ✲**

डॉ. शिवाजीराव देशमुख

**✲ मार्गदर्शक ✲**

डॉ. अरुण प्रभुणे

**✲ संपादक मंडळ ✲**

डॉ. सतीश कदम — डॉ. दीपक चिद्दरवार

डॉ. विजय वारकड — डॉ. महादेव वाळुंज

---

**प्रकाशक** : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन,
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५

**मुद्रक** : कॉम्पप्रिन्ट कल्पना प्रा. लि. ४१६/४ सदाशिव पेठ, पुणे ३०.

**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता : डॉ. नानासाहेब सूर्यवंशी**

'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, ता. अहमदपूर
जि. लातूर ४१३५१५. भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१

E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com

वार्षिक वर्गणी : रु. ५००/-
द्विवार्षिक वर्गणी : रु. ९००/-
पंचवार्षिक वर्गणी : रु. २०००/-
अंकाचे मूल्य : रु. १२५/-

---

✲ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

✲ या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक/लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १) | महात्मा बसवण्णांच्या वचनसाहित्यातील विषमताविरोधी विचार | डॉ. दत्ता पाटील | ९ |
| २) | प्रज्ञा पवार यांच्या कवितेतील सामाजिक विषमतेचे चित्रण | प्रिं. डॉ. शिवलिंग मेनकुदळे | १३ |
| ३) | तथागत गौतम बुद्धांचे समतेचे विचार व कार्य | प्रा. डॉ. सुभाष वाघमारे | १६ |
| ४) | अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील स्त्री शोषणाचे चित्रण | डॉ. दत्तात्रय बारबोले | २२ |
| ५) | दलित साहित्यातील विषमतेचा हुंकार | डॉ. प्रतिभा जाधव-निकम | २५ |
| ६) | आदिवासी कादंबरीतील विषमतेची चित्रण | डॉ. के. के. पवार | २८ |
| ७) | बारोमास वास्तवतेचे जिवंत चित्रण | डॉ. मेघमाला मेश्राम | ३४ |
| ८) | संताची समतेची गुढी | डॉ. दत्तात्रय डुंबरे | ३८ |
| ९) | भटक्या विमुक्त पारधी साहित्यातील सामाजिक विषमतेचे चित्रण | प्रा. अनिल वागर | ४१ |
| १०) | श्रीराम दुर्गे यांच्या क्षितीजापलिकडचा सुर्य | डॉ. संजय पाटोळे | ४७ |
| ११) | ग्रामीण कादंबरीतील लिंग व्यवस्थेतून चित्रीत झालेली विषमता | डॉ. वाघमोडे एस. वी. | ५९ |
| १२) | तुकाराम : सामाजिक विषमतेवर प्रहार करणारा योध्दा संत | डॉ. मानसी लाटकर | ६२ |
| १३) | संघर्षमय जीवनाची कहाणी उचल्या आत्मकथन | डॉ. कांचन नलावडे | ६८ |
| १४) | दलित आत्मकथनाचा परिपेक्षातून भटक्या जमातीच्या | डॉ. शैलजा शिंदे | ७० |
| १५) | दलित साहित्यातील सामाजिक समतेचे व विषमतेचे चित्रण | डॉ. विजया पाटील | ७५ |
| १६) | मराठी दलित कवितेतील विषमतेचे चित्रण | डॉ. आनंदा वारके | ७९ |
| १७) | महानुभव पंत यांच्या मौखिक परंपरा – काही निष्कर्ष | डॉ. बाळकृष्ण लळित | ८३ |
| १८) | संत तुकाराम महाराज यांच्या साहित्यातील विज्ञान | डॉ. दीपक सुभाषराव सुर्यवंशी | ८६ |
| १९) | जागतिकीकरणातील सामाजिक व शैक्षणिक विषमता | डॉ. डी. बी. सोळुंके | ९० |
| २०) | दलित साहित्यातील विषमतेचे चित्रण | डॉ. शकुंतला एम. भारंबे | ९३ |
| २१) | आदिवासी साहित्यातील विषमतेचे चित्रण | प्रा. सुरकुले अनिता सोमनाथ | ९६ |
| २२) | माडगुळकरांच्या कथेतील उपेक्षितांचे चित्रण | प्रा. बाळासो सुतार / आशा विठ्ठल सुतार | ९८ |
| २३) | 'कोल्हाट्याचे पोर' या आत्मकथनातील विषमतेचे चित्रण | प्रा. सर्वगोड एन.सी. | १०२ |
| २४) | दलित साहित्यातील सामाजिक समतेचे चित्रण | श्री. राहूल भागवत गायकवाड | १०५ |
| २५) | जात – धर्म – लिंगभाव एक दृष्टीकोण | प्रा. एम. के. शिंदे | १०९ |
| २६) | ग्रामीण साहित्यातील धर्म जात व लिंग आधारित विषमतेचे चित्रण | प्रा. निलेश मधुकर लंगोटे | ११४ |
| २७) | सुबोध जावडेकरांच्या गुगली आणि आकाश भाकिते ..... | डॉ. सचिन गंगाधर गिरी | ११७ |
| २८) | स्त्रीवाद साहित्यातील धर्म, जात व लिंग यावर आधारित .... | प्रा. सोनवणे राहूल बापुराव | १२० |
| २९) | चित्रा कादंबरीतील स्त्री दर्शन | डॉ. माने हनुमंत तुकाराम | १२३ |
| ३०) | भटक्या विमुक्त विषमतेचे चित्रण | डॉ. अतुल नारायण चौरे | १२६ |
| ३१) | दलित साहित्यातील धर्म, जात व लिंग विषमतेचे चित्रण | डॉ. किरण प्रभाकर वाघमारे | १३० |
| ३२) | स्त्रीवादी साहित्यातील विषमतेचे चित्रण | कु. निकिता अनिल शेंडगे | १३६ |
| ३३) | जागतिकीकरण आणि ग्रामीण साहित्य | प्रा. सचिन पोपट सवने | १३८ |
| ३४) | स्त्रीवादी साहित्यातील धर्म, जात व लिंग यावर आधारित .... | डॉ. जगदाळे किरण आगतराव | १४३ |
| ३५) | सुशिक्षित बेरोजगार तरूणांच्या दैन्यावस्थेचा दाहक अविष्कार .... | डॉ. दादाराव एकनाथ गुंडरे | १४६ |
| ३६) | अंतर्गत मानसिक पडझडीचे चित्रण करणारी मराठी प्रायोगिक कथा | डॉ. युवराज देवाळे | १४९ |
| ३७) | दलित कवितेतील सामाजिक विषमतेचे व समतेचे चित्रण | डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | १५२ |
| ३८) | जागतिकीकरणानंतरच्या मराठी ग्रामीण कवितेतील सामाजिक .... | डॉ. एन. व्ही. शिंदे | १५९ |
| ३९) | दलित संत चोखामेळा व रोहिदास यांच्या काव्यातून अभिव्यक्त | श्री. राहूल विनोदराव राऊत | १६२ |
| ४०) | आदिवासी कादंबरीतील सामाजिक विषमता | प्रा. विनायक राऊत | १६५ |
| ४१) | जागतिकीकरणाचा नंतरच्या मराठी साहित्यातील समतेचे .... | प्रा. सुरवसे तुकाराम नागनाथ | १७० |
| ४२) | वर्तमान समाजव्यवस्थेतील विषमता वळवाचे पाणी | डॉ. जयदेवी पवार | १७३ |
| ४३) | ग्रामीण साहित्य कृती 'तहान मधील मुल्यात्मक संघर्ष | डॉ, विजय झुंजाराव | १७५ |
| ४४) | कविता महाजन यांच्या कादंबरीतील विषमतेचे चित्रण | डॉ. सुवर्णा नामदेव पाटील | १७९ |
| ४५) | जागतिकीकरणात उत्तम कांवळे यांच्या कविता | डॉ. शशिकला भिमराव रणदिवे | १८२ |
| ४६) | स्त्रीवादी साहित्यातील विभावरी शिरुरकर, ताराबाई शिंदे ..... | सौ. कुंभार शुभांगी तानाजी | १८९ |
| ४७) | दलित साहित्यातील धर्म, जात व लिंग यावर आधारित ..... | डॉ. आचार्य आर. डी. | १९२ |
| ४८) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर –एक स्त्री उध्दारक | प्रा. मीरा माधवराव देठे | १९४ |
| ४९) | 'मरणकला' आत्मकथनातील स्त्री चित्रण | प्रा. मीरा माधवराव देठे | १९९ |
| ५०) | दलित कथेतील राजकीय विषमतेचे चित्रण | डॉ. मधुकर बैकरे | २०१ |
| ५१) | मराठी कवितेतील धर्म, जात व लिंग विषयक विषमतेचे चित्रण | डॉ. जनार्धन दामू परकाळे | २०५ |
| ५२) | दलित साहित्यातील प्रश्न व समस्या | डॉ. भरत भिमराव जाधव | २०९ |

# भटक्या विमुक्त; पारधीद्ध साहित्यातील सामाजिक विषमतेचे चित्रण

प्रा.डॉ.अनिल बळीराम बांगर
मराठी विभागप्रमुख
को.ए.सो.लक्ष्मी.शालिनी महिला महाविदयालय
पेझारी ता.अलिबाग जि रायगड
भ्रमणध्वनी ९०२८०९२१११

प्रास्ताविक

'पारधी' हे गिरीश प्रभुणे यांचे पुस्तक श्री– हंसराज प्रकाशनाने फेब्रुवारी २००६ मध्ये प्रकाशित केले. 'पारधी' ही भटक्या –विमुक्त जमातीपैकी एक जमात आहे. या कलाकृतीत लेखकाने 'पारधी' या भटक्या विमुक्त जमातीचा पट शब्दबध्द् केला आहे. समाजाने वेशीबाहेर ढकलेल्या आणि खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्यापासून आजही वंचित राहिलेल्या एका अन्यायग्रस्त जमातीची ही आक्रोशकथा आहे. लेखक जरी ब्राम्हण असला तरी चळवळीत काम करत असताना लेखकाचा या समाजाशी संबंध आला. या जमातीतच त्याला (लेखकाला) जवळून दर्शन झाले. प्रत्यक्ष समाजात वावरत असताना त्याला आलेले अनुभव या कलाकृतीत अभिव्यक्त केले आहेत. जातीबध्द् हिंदू समाज रचनेत प्रत्येक हिंदूला जन्मताच कोणती तरी जात बहाल केलेली असते अगदी त्यांनी स्वत: जरी जात नाकारली तरी समाज त्याच्या जन्मावरून त्याला जातीच्या धर्मात ढकलतो.

- 'उपरा' या लक्ष्मण माने यांच्या आत्मकथनाच्या प्रसिध्दीनंतर महाराष्ट्रामध्ये भटक्या–विमुक्तांची चळवळ दिवसेंदिवस जोम धरू लागली. त्यामुळे स्वत:च्या हक्काची व्यक्तीस्वातत्र्यांची अस्मितेची प्रथमच महाराष्ट्राच्या इतिहसात जाग निर्माण झाली. भटक्या–विमुक्तांच्या चळवळीमुळे महाराष्ट्रील अठरा पगड जातीपलीकडील जो भटका समाज आहे. तो शेकडो वर्षापासून उपेक्षेचे जीवन जगतो आहे, त्या समाजाला महाराष्ट्राच्या इतिहासात स्वातंत्र्योत्तर काळात प्रथमत:च 'आत्मभान चळवळीमुळे मिळाले या समाजाला स्वत:च्या स्वत्वाची अस्तित्वाची, अस्मितेची, हक्काची प्रथम जाणीव झाली. स्वातंत्र्योत्तर काळात भटका समाज हा उपेक्षितच राहिला त्यामुळे स्वातंत्र्याने आम्हाला काय दिले असा प्रश्न उपस्थित होतो.मातृभूमीने यानांच का उपेक्षित ठेवले? सध्या माणुसकीच्या हक्काची ते मागणी करतात ना? परंतु स्वातंत्र्योत्तर भारतीय लोकशाही या समाजापर्यंत पोहचू दिली गेली नाही. म्हणूनच हा समाज आक्रोशत आहे. आपल्या न्याय हक्कासाठी भटक्या –विमुक्त नागरिक चळवळीच्या निमित्ताने धडपडतो आहे.
- चळवळ व संघटनेच्या माध्यमातून भटक्या विमुक्तांच्या जीवनातील समस्या सोडविण्याचा प्रयत्न गिरीश प्रभुणे यांनी केला हा प्रयत्न खालील मुदद्यांच्या अनुषंगाने आपल्या लक्षात येईल.

१) जातपंचायत
२) पोलिस शोषण व पिळवणूक
३) विवाह पध्दत
४) सुधारणेकडे सुटलेल्या
५) भटकी स्त्री
६) भूक
७) दारिद्रय शोषण समस्याग्रस्त भटका समाज
८) गुन्हेगारी जीवन
९) विविध सविधांपासून वंचित
१०) भटक्या समाजाचे स्वातंत्र्यचळवळीतील ऐतिहासिक योगदान

१) जातपंचायत

भटक्या विमुक्तांना लोकशाही पध्दतीने दिला जाणारा न्यायालयाचा निर्णय मान्य नाही परंपरागत जात पंचायतीवर त्यांचा दृढ विश्वास आहे. पारधी जगातीतील भांडणे–देवाण–घेवाण, विवाहबाहयसंबंध इ. वर जातपंचायत भरते व पंच निर्णय देतात. पारधी जगातीतील एक स्त्री व तिचा थोरला मुलगा यांच्यात शरीरसंबंध होतो. हा विषय जातपंचायतीत न्यायनिवाडयासाठी येतो अशा अनैतिक गुन्हयाबददल शिक्षा ठरलेल्या असतात. गुन्हा केलेल्या स्त्रीने मातीचा ढीग तयार करून यात मालक प्रथम लघवी करणार नंतर पंचमंडळी व इतर म्होरके लघवी करणार यानंतर गुन्हेगार स्त्रीला तो मूत कालवून त्याचे पाच उंडे (गोळे) तयार करून त्याची भाकरी करण्याची शिक्षा दिली जाते. गुन्हेगार स्त्री 'मांजरीन हाय आन उलटया पायाची हडळ बीह हाय पोरालादंड बसविला' दंड फेडण्याची मुदत नातू पणतू पर्यंत आहे मुलगी असेल तर पंच मुलीला विकणार व आपली रक्कम वसूल करणार.
पारधी जातपंचायतीचा कायदा फार वाईट आहे. उदा– एखादी स्त्री सिंदल (वाईट वळण) असेल, तरतिला जन्मभराची अदद्ल घडवतात.

– स्त्रीने जिभेने सिंदल असेल, तर जिभेला डाग देतात.
– स्त्रीचा कान सिंदल असेल, तर कानात तापवलेले तेल ओतले जाते.
– डोळा सिंदल असेल तर, डोळयाला डाग देतात.
– स्त्रीने अब्रू नासविली आणि गुन्हा कबूल केला नाही, तर तव्यावर उकळत्या तेलातून पैशांचे नाणे काढायला लावतात.

पारधी समाजात स्त्रीशिवाय पुरूषांच्या शिक्षा भिन्न स्वरूपाच्या आहेत. पंचांनी दिवसभर गोळा केलेल्या शेणाच्या गोवऱ्या पेटवून पहार तापवतात. पंचाच्या हुकूमानुसार तापवलेली पहार उचलायला सांगतात.

**२) पोलीसी शोषण व पिळवणूक**

कोणाची वस्तू हरवली कोठे चोरी झाली तर प्रथमत: पोलिस खाते भटक्या (पारधी) लोकांवर संशय व्यक्त करते संशयित गुन्हेगार म्हणून त्यांना तुरूगांत डांबले जाते. जणू काय संशयित गुन्हेगार म्हणून जन्मजात भटक्यांना ओळखले जाते. हा गुन्हेगारीचा शिक्का नाहीसा करण्यासाठी भटक्या विमुक्त चळवळीतील कार्यकर्त्यांनी जनलढा आरंभला आहे या लढयातून भटक्यांच्या पोलिसी शोषणाच्या व पिळवणूकीच्या अनेक कहाण्या जाग्या होतात.

१) शेतकऱ्यांची कणसे,मोटार, कापड,जनावरे एखादी किंमती वस्तू चोरीला गेली म्हणजे हमखास पोलिस पारध्याचेच नाव घेतात.

२) पारधी पुरूष शिकारीत एवढे सामर्थ्यवान परंतु गावगुंडाच्या जुलमाचे शिकार होतात. गावकरी त्यांना साधी माणुसकीची वागणूक देत नाहीत.चोरच समजतात. जन्मात चोरी केली नाही पण पोलिस स्टेशनला संशयीत गुन्हेगार म्हणून पारध्यांची नोंद व फोटो आढळतो यामुळेच मराठवाडयातील सेलूच्या पारधी व त्याच्या बायकोला अनुक्रमे उस्मानाबाद व नांदेड जिल्हा बंद असतो. त्यांची भेट जालना—औरंगाबाद होत असते.

३) रमेश काळेचा मृत्यू हा पोलिसांच्या मारहाणीत झाला असला तरी आपण ही गोष्ट ध्यानात घ्यायला हवी की, कुठंही चोरी–दरोडा पडला, तरी पोलीस प्रथम पारध्याच्या पालावर येतात. त्यातूनच अत्याचार आणि असा रमेश काळेचा मृत्यू घडतो यात आपल्या पैकी काहीजण चोऱ्या करतात हे ही खरं आहे आणि त्यामुळेच अशा अत्याचाराच्या घटना घडतात. एकाच्या चुकीचे परिणाम दुसऱ्या अनेकांना भोगावे लागतात रमेश काळेला ज्या दरोडया संदर्भात पकडले तो कोणी घातला माहीत नाही परंतु आज आपण त्याच्या मातीला जमलो आहोत तर आपण रमेश काळेची माती हातात घेऊन शपथ घेऊन निश्चय करू या कीएश्मी आता चोरी करणार नाही दारू गाळणार नाही. कष्ट करून जगेन (पारधी पृ. २६५)

**३) विवाह पद्धत :–**

वेगवेगळया भटक्या जमातीमध्ये विवाहपद्धत ही वेगवेगळी आहे. पारधी समाजाच्या विवाहपद्धतीत ब्राम्हण लागत नाही बेंडबाजाची आवश्यकता भासत नाही मुलीला हुंडा देण्याची प्रथा आहे. वधू–वरांना उभे करून त्यांच्या अंगावर पाणी घालून लग्न लावले जाते यावेळी लहान गुले व मोठया माणसांच्याही अंगावर पाणी घातले जाते.(लहान

मुलांना आंघोळ घालण्याची प्रथा सवर्ण समाजातही रूढ आहे वधू – वरांना दोघांनाही देवासमोर उभे करणे [illegible] किंवा पिंपळपानाचे बांशिंग बांधून पुन्हा पाणी घातले जाते प्रथम वराने सुरूवात करून एकमेकांच्या अंगावर पाणी घालण्याची प्रथा रूढ आहे. नंतर पाण्याची चूळ भरून देवाला रेडा मारून नैवेद्य दाखविणे ही प्रथा आहे.

४) सुधारणेकडे झुकलेला भटका समाज :–

भटक्या – विमुक्तांच्या चळवळीमुळे महाराष्ट्रातील अठरापगड जातीपलीकडे जो भटका समाज आहे तो शेकडो वर्षांपासून उपक्षेचे, उपरेपणाचे जीवन जगत होता. त्या समाजाला महाराष्ट्राच्या इतिहासात स्वातंत्र्योत्तर काळात प्रथमत: चळवळीमुळे आत्मभान आले'' टिळक स्मारक मंदिरात पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम होतापुण्यातल्या सर्व महाविदयालयातली एन.एस.एस.ची शिबीरं पार पडली होती त्यातल्या प्रत्येक कॅम्पमधल्या विधार्थ्यातून एका आदर्श विधार्थ्याची निवड करण्यात आली होती.सर्व महाविदयालयामधून निवड झाली होती परमेश्वराची! आईला बापानं जाळून मारलेलं बाप चो.यामा.या करत हिंडतोय जेलमधून आतबाहेर चालू आहे अशाही स्थितीत परमेश्वरनं 'यमनगरवाडीत राहून शिक्षण पूर्ण केलं पुढच्या शिक्षणासाठी तो २००४ ला पुण्यात आला.विदयार्थी साहायक समितीच्या ' कमवा आणि शिका'योजनेमधून काम करत शिकू लागला.त्याच्या जोडीला गणेशएभावनाए रेणुकाए संजनाए कंगनाए सुषमाए मनिषाए मिनाक्षीए अरूणाए सीमा अशा सेवासदन आणि महर्षी कर्वे शिक्षण संस्थेच्या वसतिगृहात शिकायला मुली आल्या फक्त येथे चौघेजण शिकायला होते.'' (पृ ३७८)

समाजापासून अलग झालेल्या, उध्वस्त झालेल्या जमातीतील संस्कारित अशी पहिली तुकडी स्वत: बरोबरच समाजाच्या विकासाचं स्वप्न पाहणारी यमनगरवाडीच्या माळरानावरची शाळा सोलापूरच्या धारशीवच्या रानातली पालं वस्त्यामधुन आलेली मुलत्यांनी भविष्याला खेचून आपल्या मुठीत पकडल होतं. आता तेच घडवणार होते. स्वत:चं भविष्य स्वत: बरोबर समाजावरचा गुन्हेगारीचा शिक्का पुसण्याच्या निर्धारानं त्यांची पावलं पडू लागली होती.

या समाजात जनजागृती निर्माण व्हावी म्हणून कार्यकर्त्यांनी औरंगाबाद येथे 'गुन्हेगार निर्मूलन परिषद आयोजित केली होती या समाजाच्या दृष्टीने ही परिषद परिवर्तनीय ठरली यांना संशयीत गुन्हेगार म्हणून पोलिस कसे पकडतात. त्यांच्यावर अन्याय अत्याचार कसे करतात. त्यांच्या हकीगती परिषदेमध्ये सांगीतल्या गेल्या. यासंदर्भात या परिषदेचे बाबा आढावांच्या आग्राहास्तवपारधी समाजीतील स्त्री गंगुबाई बजरंग काळे या आपल्या पाठच्या बहिणीची व्यथा मांडतात. भटक्या–विमुक्तांच्याचळवळीमुळेच श्रीमती काळे बोलू शकतात ही चळवळीचीच यशस्विता आहे. याच परिषदेत एक हजार माणसांचे पुनर्वसन करण्याचा महत्वाकांक्षी ठराव संमत केला होता. या परिषदेच्या समारोप प्रसंगी रंगावैध्य म्हणातात, ''स्वाभिमानाए स्वत्व, समताया मूल्यांसाठी सुरू झालेल्या संगरात स्त्री–पुरूष, श्रमिक, दलित, अदिवासी इ. सामील व्हायला हवे.'' स्वातंत्र्योत्तरकाळात भटका समाज हा उपेक्षित राहिला. त्यामुळे स्वातंत्र्याने आम्हाला काय दिले असा प्रश्न उपस्थित करतो आहे. आज भटक्या समाजाला लक्ष्मण माने, हरिभाऊ राठोड, नवनाथ आव्हाड यांचे नेतृत्व लाभले असल्यामुळे आपल्या न्याय, हक्कासाठी भटक्या–विमुक्त नागरिक चळकवळीच्या निमित्ताने धडपडतो आहे.

५) भटकी स्त्री :– (स्त्री जीवन )

एकीकडे आदिम जीवन जगणारा अत्यंत मागास अंधश्रद्धा जपणारा स्त्री – पुरूष संबधाविषयी आदिम हळवेपणानं पाहाणारा पारधी समाज स्त्रीच 'मूल्यच' केवळ मूल्य समजणारा हा समाज दुसरीकडे नव्या युगाकडे वेगान झेपावणारा हिंदू समाज तो ही पारंपारिक! स्त्री पुरूषसंबधाकडे मध्ययुगीन नजरेने पाहणारा व या दोन्ही घटकांमध्ये 'पूल' बनण्याची ऐतिहासिक भूमिका यमनगरवाडीला बजवायचीय त्यामुळे या सर्व घटनांकडे केवळ पारंपारिक'रक्षका'च्या भूमिकेतून बघून चालणार नाही पारधी समाजातील सुशिक्षित स्त्री रेणुकाच्या डोळया समोर रोजच पारधी समाजाचा इतिहास घडत होता. स्त्रियांची होणारी अवहेलना, तिची विटंबना दिसत होती. अगदी जवळच्या दहा बारा नातेवाईक स्त्रिया तिच्या बरोबरीच्या लग्न होऊन उध्वस्त झालेल्या मुलीच जीवन या वसतिगृहातील मुली पाहत होत्या त्याच बरोबर अन्य समाजातल्या उत्तम शिकून सन्मानान जीवन जगणाऱ्या स्त्रियाही त्यांना पाहायला मिळत होत्या. (पृ.३७३)

 ISSN - 2229-4929

मराठवाडयातील जालना येथील दौऱ्यामध्ये लेखक पारधी समाजाच्या पालावर गेले असता तेथे दोन तासापूर्वी बाळंतीण झालेल्या पारधी स्त्रीचे चित्र आढळले या स्त्रीचे लुगडे गुडग्यापर्यंत होते हातात कथलाच्या बांगडया अंगात दंडापर्यंत चोळी, कपाळावर गोंदलेले दातवणाने दात काळेभोर झालेले केसांच्या बटा असलेली स्त्री आहे. जेव्हा तिच्या नवऱ्याला पोलिसांनी पकडून नेले तेव्हा ती नुकतीच बाळंतीण झालेली होती ती वकिलाकडून जामीनं देऊन नवऱ्याला सोडविते यावेळीवकील तिच्याकडून फीसुद्धा घेत नाहीत या स्त्रीविषयी लेखक म्हणतात ''अगोदरच्या दिवशी बाईच मुल पोटात होत दुसऱ्या दिवशी बाई कोर्टात जामीन भरायला गेली तर मुल मांडीवर होत. ही बाई नवऱ्याला सोडवण्यास सकाळपासून कोर्टात हजर होती बारातासांची बाळंतीण हातात जीव घेऊन नवऱ्याला सोडण्यास बसली होती.

औरंगाबाद येथील गुन्हेगार निर्मूलन परिषदेमध्ये बोलकी झालेली स्त्री गंगुबाई बंजरंग काळे आपल्या भाषणात लहान बहिणीची ०यथा मांडते "दोन गांवची माणस आल्यात ती आता आपल्याला माणसांसनी मारून टाकत्यात बाया पोरानला माराय लागल्यातबायाची लूगडे फेडत्यात आन झिंज्याला कांद बांधाया लागत्यात म्या चार पाच काठया खाल्या आन मेल्यावानी पडली तवा मला सोडली म्या डोळा चुकवला आनं पळाली."

''काका,बातमी वाचलीत'' दूरदर्शनवर दाखवताहेत परांडयाची(उस्मानाबाद) भयंकर आहे पाच पारध्यांना दगडांनी ठेचून हत्या करण्यात आली आहे. परांडयाजवळच शेळगांव या ठिकाणी पाच पारध्यांना त्यात एक महिला होती.एस.टी. गाडीतून खाली खेचून जमावांन दगडानं ठेचून मारल होत महिलेला विवस्त्र करून खांबाला बांधण्यात आल विद्रूप करण्यात आल तर लहान मुलाला पकडून एस.टी. वरच्या टपावरच्या कडयांना दोर बांधून फाशी देण्यात आल '' (पृ३५६–३५७)

**६) भूक –**

"पारधी" या कलाकृतीकधून पारधी या भटक्या जमातीची भूकेची तीव्र वेदना जाणवते टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी प्रसंगी लाचारी सुध्दा स्वीकारावी लागते. पारधी या भटक्या जमातीतील स्त्री –पुरूष भूक भागविण्यासाठी दरोडा घालतात, चोऱ्या करतात. खून करतात. 'वशा आणि जावद्या काळे या दोन बंधूच्या पोलिसाकरवी झालेल्या हत्येला बारा वर्ष होवून गेली पुराव्याअभावी केसच उभी राहू शकली नाही ''कुर्डूवाडी येथील घटना ) पृ३२९)

लातूरच्या भटक्या –विमुक्ताच्या मोर्चात सामील झालेली एक पारधी जमातीतील स्त्री आपल्या संतापातून समाजात विषमता कशी आहे ते सांगते "तुझा सरकारला सांग पारध्याला गोळया घालून मारुन टाक म्हणावं, आमची वंशबुडी झाल्यावर चोरी ०हनार नाय पारध्यांन कंच्या जलमांच पाप केलं म्हणं त्यांन रानोमाळ हिडांव आन गावातल्या माणसांन कंच पुण्य केल म्हणं त्यानं एका जागेला ऱ्हाव पोर बाळं शिकवाव, होस मौज करावं? भूक भगविण्यासाठी स्वत:च्या मुलीला विकतो.""पारधी समाजातील एका विकलेल्या मुलीची कहाणीफार मजेदार व स्त्रीजीवनाविषयी विचार करायला लावणारी आहे एका मुलीचे लग्न एक वर्षाची असतांना झाले त्यावेळी तिच्या बापाने तिला ५० रू.ला विकले पहिल्या नवऱ्यापासून चार मुले झाली या नवऱ्याने दुसऱ्याला विकल्यावर सात वर्षे राहून तीन मुले झाली नंतर ही स्त्री तिसऱ्या नवऱ्याला विकली गेली त्यांच्या जवळ दोन वर्षे नांदली तिसऱ्याने चौथ्या नवऱ्याला विकले त्याच्याजवळ १० वर्षे राहून पाच मुले झाली चौथा नवरा येरवडयाच्या तुरूंगात गुन्हेगार म्हणून गेला तेव्हा या स्त्रीने पाचवा नवरा न करता आपल्या थोरल्या मुलांशी (बंजरंग)शरीरसंबंध निर्माण केला. आई आणि मुलगासुद्धा या संबंधाचे उघड समर्थन करतात.०यभिचारच कसा नितीमान ठरतो,हे या संबंधातून लक्षात येते याच स्त्रीने लेखकाकडे घर (निवारा) जागा जमीन पोलिसापासून संरक्षण अन्न ,वस्त्र (लज्जा रक्षणार्थ)इत्यादीची मागणी करून भटक्या विमुक्त जाती संघटनेत काम करण्याची इच्छासुद्धा प्रकट केली.

**७) दारिद्रय– शोषण –समस्याग्रस्त भटका समाज:–**

महाराष्ट्रातील सर्वच भटक्या जाती–जमातीमध्ये दारिद्रय, बेकारी, तीव्र प्रमाणात भेडसावते याला या पुस्तकातील भटक्यांचे जीवनसुद्धा अपवाद नाही भटक्या जाती–जमाती दरोडा घालतात. असे समतले जाते मग नंतर हया दरोडयातून मिळालेल्या पैशाच्या माध्यमातून सुखी जीवन का जगता येत नाही असे मुळातले प्रश्न तांडा

पाल—वस्त्यावरील भटके लेखकाला विचारतात इंदापूरचा अंकुशा काळे सांगत होता....

''माजा जनम झाला तवा माजी माय तुरूंगात व्हती म्हाभारतात किसनाचा जनम असाच जाला त्येची माय पनं तुरूंगातच व्हती पर तो राजा आला त्येंन धरगगीत सांगितली आगी पारधी माज्या परीस कितीकांच जनम असंच झाल पर आमाला इतबर जमीन नाय पाय टेकायला आमच आभाळ कोन्चं, आमाला नाय म्हाईत आमच राष्ट्र कोनचं आमाला नाय म्हाईत आमचा देश कोन्चा? सवतंत्र म्हजे काय ? आगी कोण ? खरंच आगी कोण ? मी कोण?(पृष्ठ १)भटकी स्त्री अर्ध्या लुगडयांवर अंघोळ करते, अर्धे लुगडे कोरडे ठेवते कोरडे लुगडे नंतर ती परिधान करते. ओला झालेला भाग नंतर धुवून ती परिधान करते. ही वस्त्राची कमतरता समस्त भटक्या स्त्रीला तीव्रतेने जाणवते.

भटक्या समाजातील पुरूषाचे विशेषत : स्त्रियांचे शोषण (शरीर भूक भागविणारे माध्यम —भटकी स्त्री )करणारे गावातील गुंड, गुन्हेगार पोलीस आहेत. भटक्या विमुक्तांच्या संघटना पातळीवर स्त्री शोषणांचा प्रश्न न्यायासाठी गेला तरी गुंड गुन्हेगाराला शिक्षा होऊ नये म्हणून प्रस्थापित पोलिसांशी संगनमत करून प्रकरण मिटवतात.

जागा,निवारा,अन्न,वस्त्र,पाणी,वीज,भूक,कौटुंबिक झगडे विवाहबाहय संबंध,शिक्षण,दारिद्रय,अत्याचार, शारीरीक शोषण बेकारी इत्यादी सर्व प्रश्नांना भटक्या विमुक्तांना सामोरे जावे लागते. या सर्व प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी भटक्या— विमुक्तांच्या विविध जाती संघटना व समाजवादी मंडळी आपापल्या परीने प्रयत्नशील आहेत संघटनेच्या रेटयांमुळे शासन दरबारी अनेक प्रश्न मार्गी लागले आहेत. ही समाधानाची बाब 'पारधी' या कलाकृतीतून प्रकर्षाने जाणवते.

**८) गुन्हेगारी जीणे :—**

भटक्या समाजातील स्त्री—पुरूषांना पोलिसखाते जन्मजात गुन्हेगार समजते कोठेही चोरी, दरोडा पडला की, संशयित गन्हेगार म्हणून भटक्यांचे नांव गोवले जाते कोणत्याही प्रकारची शहानिशा न करता तांडया,वस्त्यावर येणे म्हणजे 'यम' आल्यागत वाटते संशयित गुन्हेगार म्हणून पारध्याच्या तांडयावर पोलीस हल्ला करून स्त्रिया,मुल,मुली यांना अमानवी पद्धतीने छळतात. धाराशीव म्हणजे उस्मानाबाद जिल्हांत भटक्या समाजावर अन्याय अत्याचार हे अधिकच घडत आले ढोकी हत्यांकांड;नामदेव बागडी, मृत्यू प्रकरण, जयश्री भोसले,बेबी पवार यांच्या वरच्या अत्याचारासारख्या घटना आणि किरकोळ प्रकार तर रोजच घडत अनेक घटना दडपणामुळे पोलीस चौकीतही नोंदवल्या जाते नसत. ''काका (लेखक) पारध्याची घर जाळून टाकली दीडशे घर जाळली''(कळबची घटना) (पृ.२९२)

कुठे दरोडा पडला, खून झाला की समाजाचा रोष हा पारधी समाजाकडेच दिसून येतो बारामतीचा पिन्या हरी काळे , मंगळवेढयाचा रमेश काळे,अकलुजचा दुर्योधन काळे, यांच्या सारखे अनेकांचे मृत्यू पोलिसांच्या मारहाणीत झाले हे सर्व होण्याला कारणीभूत जसे पोलीस आहेत समाज आहे सरकार आहे तसेच आपणही आहोत. जन्मतच गुन्हेगारीचा शिक्का या समाजावर मारला गेला असल्यामुळें कुठे काही घटना घडली की पोलीस संशयित गुन्हेगार म्हणून पारध्याच्या पालावर (तांडयावर) हल्ला चढवितात. त्यामध्ये स्त्रियांना मुलांना अमानवी पद्धतीने छळतात. आण्णापा मिलमध्ये नोकरीला असल्यामुळेबऱ्यापैकी समृद्धी होती आण्णाप्पाच्या हाताच्या बोटातील सोन्याची अंगठी, स्कूटर पोलिसांना चोरीची वाटते; म्हणून आण्णाप्पाला पोलीस मारझोड करतात. कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये आरोग्य विभागात नोकरी करणाऱ्या मलू शामू काळे यालाही पोलिसी अत्याचाराला सामोरे जावे लागते

**९) सुविधापासून वंचित**

शासनाच्या एन. आर. डी. पी. बेघरांसाठी घरकुल योजना बॅंकांच्या अनेक योजना या समाजाच्या उन्नतीसाठी निर्माण करण्यात आल्या परंतु कमाल अडाणीपणामुळे, अज्ञानामुळेच या सुविधाचा लाभ घेता येत नाही. मतदानाच्या लोकशाही हक्कापासून हा समाज अलिप्त राहतो कारण लोकशाही निवडणुकांना जे विकृत रूप प्राप्त झाले त्या विकृतपणामुळे नाहक आपला बळी जाईल या भीतीने हा समाज अलिप्त राहतो. मतदान करूनही लोकप्रतिनिधी आपल्याला सहानुभुती दाखवेल यावरही या समाजाचा विश्वास नाही हक्काचे गाव नाही त्यामुळे हक्काची स्मशानभूमी नाही.

**१०) भटक्या समाजाचे स्वातंत्र्य चळवळीतील ऐतिहासिक योगदान :—**

स्वांतत्र्य चळवळीतही भटक्या समाजाच योगदान मोलाच आहे. '' मुसलमाना नंतर हा देश इंग्रजांनी ताब्यात घेतला १८५७ चं स्वातंत्र्य युद्ध इंग्रजांनी मोडून काढलं अनेकांना फासावर दिले, हत्तींच्या पायी दिल, निर्वंश केल भटक्या समाजातील अनेकांनी स्वांतत्र्यलढयात सहभाग घेतला परंतु दु:ख असे की, या स्वांतत्र्यावीरांचा साधा नामोल्लेख कोठेही आढळत नाही. क्रांतिवीर उमाजी नाईक, क्रांतिवीर समशेरसिंग पारधी, छोटूसिंग, लक्ष्मण धर्मप्रताप वंजारी, क्रांतिवीर वासुदेव बळवतं फडके यांनी केलेले बंड प्रसिद्ध आहे. शत्रूच्या गटांतून बातमी आणणारे बहिर्जी नाईक,हिरोजी फर्जद हे छत्रपती शिवरायाचे खरेबहादूर होते. ब्रिटिशांच्या विरोधात १८५७ च्या लढाईत मारलेले सातारचे चितरसिंग बेरड, खानदेशातील पयाजी नाईक, भीमा नाईक इत्यादी या जमातीतील स्वांतत्र्यवीर इंग्रजांचा पराभव करण्यासाठी लढले आहेत.

**समारोप**

अनादी काळापासून या विज्ञानवादी, निसर्गवादी जमाती गुन्हेगार ठरवल्या गेल्या, पारधी गुन्हेगार नाहीत, चोर दरोडेखोर नाहीत. तेस्वातंत्र्य सैनिक आहेत असे गिरीश प्रभुणे म्हणतात. म्हणूनच तर इंग्रजांनी या जमातींना गुन्हेगार ठरवल कायदयान ! स्वातंत्र्य मिळाल्यावर हा काळा कायदा रद्द न होता तसाच राहिला होता. प्रत्यक्ष व्यवहारात पोलिस –शासन या जमातीशी इंग्रजांप्रमाणेच वागत राहिलं यांचा खरा इतिहास स्वातंत्र्योतर काळातही लोकापुढे आला नाही. पाठय पुस्तकातून आजही यांचा गुन्हेगार , दरोडेखोर असाच उल्लेख होत आहे. याला शासन जबाबदार, सत्ताधीश जबाबदार आहेत. हा चुकीचा बदलेला खोटा इतिहास रद्द करुन खरा इतिहास लोकांपुढे यायला हवा. याला सरकार दोषी आहे. पोलीस दोषी आहेत. त्यांना शासन व्हायला हव.

भटक्या समाजातील स्वातंत्र्यवीरांचा इतिहास का दडपला गेला . क्रातीवीर वासुदेव बळवंत फडके यांचे सेनापती रामोशी जमातीचे होते. वासुदेव बळवंत फडके बरोबर त्यांचे नावही कोणी उच्चारत नाही. क्रांतिवीरांच्या खांदयाला खांदा लावून लढणारे त्यागात जराही कमी न पडणारे बेरड रामोशी जमातीतील क्रांतिवीर असतांना सुद्धा ते मात्र गुन्हेगार दरोडेखोर असा इतिहास का सांगितला जातो. त्यांचे स्वातंत्र्य प्रेम का सांगितले जात नाही, तो इतिहास का दडपला जातो. हा भटक्या जमातीतील कार्यकर्त्याचा खडा सवाल आहे? गांधीजीच्या असहकार चळवळीत इंग्रजांशी एकाकीपणे टक्कर देणारे वीर सिंदूर लक्ष्मण, चिकळ दिनी, गुडप्पा, इत्यादी नरवीर याच समाजातील होते. इंग्रजांचे शीर तलवारीला लावणाऱ्या उमाजीचा पुतळा सर्व दुनियेत दिसत नाही तो का?

संदर्भ ग्रंथ सूची :

१) दलित आत्मकथने भाषिक समाज : भाषा आणि भाषा व्यवहार–डॉ. संपत गायकवाड
२) भारतीय समाजरचना – सुधा काळदाते
३) दलित साहित्य – शरणकुमार लिंबाळे
४) मराठी वाड्.मयातील नवे प्रवाह – शरणकुमार लिंबाळे
५) दलितांची आत्मकथने – संकल्पना व स्वरूप– वासुदेव मुलाटे